ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
PNC-116, Licence No. 34

वर्ष ४०

पुणे, बुधवार, २ जानेवारी, १९७४

अंक १

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसींचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉपलिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स – कुठेही गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर हेलकाव्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उठून दिसते. ठाकरसींच्या सुती कापडाने गारवा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीचा प्रिंट व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसींच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे नरम कापड, साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसींचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**



TF

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१९, बॅलार्ड इस्टेट, मुंबई – १.

### टेल्कोमधील कामगारांना किमान ३२५ रुपये वेतन

टेल्को कंपनी आणि हिंद राष्ट्रीय मजदूर संघ ह्यांच्यात चार वर्षांचा करार करण्यात आला आहे. ह्या करारास अनुसरून कंपनीच्या कामगारांना दरमहा किमान ३२५ रुपये वेतन देण्यात येणार आहे. त्यात अकुशल व कमी पगार मिळविणाऱ्या कामगारांचाही समावेश आहे. हा करार १ नोव्हेंबर १९७३ पासून अमलात आणावयाचा आहे. त्या तारखेपासून प्रत्येक कामगाराच्या दरमहा प्राप्तीत करारामुळे ४५ ते ५५ रुपयांची भर पडणार आहे. शिवाय डिसेंबर महिन्यांत कामगारांच्या महागाई भत्त्याची फेरआकारणी करण्यात आली आहे. ती धरून कामगारांचे किमान वेतन दरमहा ३२५ रुपये होईल. कामगारांची राहण्याची सोय करण्यासाठी दरसाल २० लाख रुपये खर्च करण्यात यावयाचे आहेत. शिवाय शिक्षणाच्या सोयी वाढविण्यासाठी २ लाख रुपये खर्च करण्यात येतील.

---

### 'कोहटेक' धूमकेतू डोळ्यांनी दिसू लागणार

सर्व जगातील खगोल शास्त्रज्ञ 'कोहटेक' ह्या नव्या धूमकेतूचे निरीक्षण करण्यात गढून गेले आहेत. जानेवारी १९७४ च्या पहिल्या आठवड्यापासून हा धूमकेतू नुसत्या डोळ्यांनी म्हणजे दुर्बिणीशिवाय दिसू लागेल असा अंदाज आहे. दृश्यमान होण्याची त्याची वेळ सूर्यास्तानंतरची आहे. २८ नोव्हेंबर १९७३ पासून तो आकाशात अस्पष्टपणे दिसू लागला. त्या वेळी तो सूर्योदयापूर्वी थोडा वेळ दिसू लागला पण त्यासाठी दुर्बिणीची मदत घ्यावी लागे. आता धूमकेतूला शेपूट उगवलेले आहे आणि ते वाढत आहे. जर्मनीतील हॅमबर्ग येथील डॉ. लुबास कोहटेक ह्यांनी प्रथम त्याचा शोध गेल्या मार्च महिन्यात लावला. म्हणून त्यांचेच नाव त्याला देण्यात आले आहे. धूमकेतूच्या मूलद्रव्याविषयी अद्याप मतभेद आहेत.

---

### भारतीय संस्कृतीविषयी झेकोस्लोव्हाकियात आस्था

झेकोस्लोव्हाकियात भारतामधील भाषा व संस्कृती ह्यांच्याविषयी बरीच आस्था दिसून येते. १९३० च्या दशकात तेथे इन्स्टिट्यूट ऑफ ओरिएंटल स्टडिज ही संघटना स्थापन करण्यात आली. ती अजूनही चांगले कार्य करीत आहे. संघटनेतील अभ्यासकांनी हिंदी, उर्दू आणि तामीळ ह्या भाषांचा चांगला अभ्यास केलेला आहे. संस्कृत भाषेचा खोल अभ्यास केलेल्या एका पंडिताने भगवद्गीता आणि तीवरील शंकराचार्यांची टीका ह्यांचे भाषांतर करण्याचे काम हाती घेतले आहे. तथापि फक्त प्राचीन भारतीय संस्कृतीबद्दलच विशेष आस्था आहे असे मात्र नव्हे. हिंदी व उर्दू भाषांतील आधुनिक कादंबऱ्यांचेही झेक भाषेत भाषांतर करण्यात आलेले आहे.

---


★ ★ ★

धनवर्धिनी परंपरेतील

११ ४ नवीन योजना

कर्जहमी ठेव योजना

ठेव परतीचेवेळी तितकेच कर्ज मिळण्याचीसुरुवातीलाच हमी

विशेष सेव्हिंग्ज खाते

७·७५ टक्के व्याज, पैसे काढताना ९१ दिवसाची पूर्व सूचना.

मुदतीचे सेव्हिंग्ज खाते

७·२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे

मासिक व्याज ठेव योजना

किमान १००० रु. (अथवा पटीत)
कमीत कमी १ वर्ष मुदत.

युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन

एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

★ ★ ★

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २ जानेवारी, १९७४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## एअर इंडिआ विमान वाहतुकीचे दर वाढविणार

आंतरराष्ट्रीय विमानवाहतूक करणाऱ्या एअर इंडिआ कंपनीने उतारूंच्या व मालाच्या वाहतुकीच्या दरात १ जानेवारीपासून ६ टक्के वाढ करण्याचे ठरविले आहे. विमानांना लागणाऱ्या इंधनाची किंमत वाढल्यामुळे दर वाढविणे भाग पडले आहे. भारत सरकारने दरवाढीला मान्यता दिली असून एअर इंडिआने आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक संघटनेला त्याप्रमाणे माहिती दिली आहे. इंधनाच्या किमतीत १० टक्के वाढ झाली तर वाहतुकीच्या दरात १·२ टक्के वाढ करावी लागते असा हिशोब आहे. अर्थात हे दर तात्पुरती वाढ म्हणून ठरविण्यात येत आहेत. ह्याचा अर्थ जरूर पडल्यास त्यात अधिक वाढ होणार नाही असा नाही. एअर इंडिआच्या चालकांनी स्थानिक चालकांची एक बैठक बोलावून त्यात सर्व परिस्थितीचा विचार केला. तशीच गरज भासली तर विमानांच्या मार्गांची पुनर्घटना करण्याचे आणि इंधन वाया जाणे थांबविण्याचे उपाय योजण्यात येतील. सध्याच्या परिस्थितीवरून असे दिसते की ज्या मार्गावर फारशी प्राप्ती होत नाही असे मार्ग बंद करण्यास कंपनी मागेपुढे पाहणार नाही. त्याचप्रमाणे अटलांटिक महासागरावरून जाणाऱ्या आपल्या मार्गावर मोठी जंबो विमाने आणि बोइंग विमाने ह्यांचा वापर आलटून पालटून करू लागेल. अमेरिका–भारत आणि ब्रिटन–भारत ह्यांच्यामधील प्रवासाला उत्तेजन देण्यासाठी सध्या चालू असलेल्या सवलतीच्या दरांत वाढ करण्यात येईल. अमेरिका–भारत प्रवासासाठी आता ४७५ डॉलर्सऐवजी ५७५ डॉलर्स द्यावे लागतील आणि भारत–अमेरिका प्रवासासाठी ५५० डॉलर्सऐवजी ६५० डॉलर्स द्यावे लागतील.

---

## अमेरिकेला जाणाऱ्या बुद्धिमतांत वाढ

अनेकविध क्षेत्रांत उच्च शिक्षण घेतलेले तरुण ह्या ना त्या निमित्ताने अमेरिकेत जातात आणि जमले तर तेथेच स्थायिक होऊ पाहतात. चांगल्या राहणीचे आकर्षण हेच ह्या प्रवृत्तीमागील मुख्य कारण असते. आशिआतील देश गरीब असल्याने ही प्रवृत्ती वाढीस लागलेली दिसते. गेल्या ८ वर्षांत भारतामधून अमेरिकेत जाणाऱ्या बुद्धिमतांच्या संख्येत ३७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. गेल्या वर्षी ७ हजारांपेक्षा जास्त हिंदी लोक अमेरिकेला निघून गेले. सर्व उच्चविद्याविभूषित होते. त्यांपैकी १५०० डॉक्टर्स, शास्त्रविशारद अगर दंतविद्यानिपुण होते. दोन वर्षांपूर्वी भारतामधून अमेरिकेत गेलेल्यांच्या संख्येपेक्षा ही संख्या दुपटीहून अधिक आहे. गेल्या वर्षी अमेरिकेत आलेल्या परदेशीय लोकांच्या गटांत भारताचा क्रमांक ८ वा लागतो. सुमारे १३,१२४ हिंदी लोकांनी गेल्या वर्षी अमेरिकेला प्रयाण केले. हिंदच्या खालोखाल मेक्सिकन नागरिक अमेरिकेला आले त्यानंतर फिलिपाइन्सचा क्रमांक लागतो. गेल्या पाच वर्षांत अमेरिकेत आलेल्या आशिआयी लोकांची संख्या वाढत चालली आहे. ह्या अवधीत देशांतर करणारांची संख्या ५०० टक्क्यांनी वाढली आहे. ३० जून १९७३ रोजी संपलेल्या वर्षात एकूण ४ लाखावर परदेशीय नागरिक अमेरिकेत आले. त्यांपैकी एक तृतियांश म्हणजे सुमारे १। लाखावर नागरिक आशिआतील देशांतून आलेले होते. १९६३ साली आशिआतून आलेल्या लोकांच्या संख्येपेक्षा हा आकडा ६ पटीने अधिक आहे. १९६३ साली अमेरिकेत आलेल्या परदेशीयांच्या संख्येत ७ टक्केच आशिआयी होते.

---

## आता छोट्या मोटरगाड्यांची चलती

गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात. ह्याचाच अर्थ असा सांगता येईल की, अडचणीच्या रूपाने अदृश्य संधीच चालून येत असतात. अरब देशांनी म्हणजे खनिज तेलाच्या मोठ्या उत्पादकांनी तेलाच्या पुरवठ्याबाबत अडवणुकीचे धोरण स्वीकारल्यामुळे सर्वांत अधिक अडचण प्रगत देशांची होणार आहे. कारण, तेथील लोक औद्योगिक समाजातील राहणीला गेली कित्येक दशके चटावलेले आहेत. त्यांना आता नव्या टंचाईच्या परिस्थितीशी जुळवून घेणे भाग पडणार आहे. युरोप-अमेरिकेसारख्या प्रगत देशात मोटरगाडी ही चैनीची बाब राहिलेली नाही. तेलाच्या टंचाईमुळे मोटारगाड्या बंद पडण्याचा प्रसंग आल्यास त्यांना ती मोठीच आपत्ती वाटेल. मागास देशांना त्यांच्याइतका त्रास होणार नाही. प्रगत देशात इंधनाची म्हणजे पेट्रोलची बचत करण्याच्या दृष्टीने छोट्या आणि वजनाने हलक्या असणाऱ्या गाड्या उत्पादन कराव्या लागणार आहेत. नुसत्या छोट्या व हलक्या मोटारी उत्पादन करून भागणार नाही; एंजिनिअर लोकांना मोटारींच्या टाकीत घातलेल्या इंधनापासून जास्तीत जास्त शक्ती कशी सिद्ध होईल ह्याचाही विचार करावा लागेल.

## "अर्थ"ला ४० वे वर्ष लागले

१ जानेवारी, १९३५ रोजी प्रा. वा. गो. काळे ह्यांनी "अर्थ"ची स्थापना केली. आजचा अंक हा ४० व्या वर्षाचा पहिला अंक आहे.

वृत्तपत्रांच्या दृष्टीने हा काही आनंदाचा काळ नाही. हे वर्ष आणि येती काही वर्षे वृत्तपत्रांना कठीण जाणार आहेत; कित्येक वृत्तपत्रे तर बंदच पडण्याचा संभव आहे. कागदाची तीव्र टंचाई आणि दुर्मिळता आणि अवाच्या सवा किंमत, ह्यामुळे प्रत्येक अंकात पूर्वीइतकी पृष्ठे देता येणे केवळ अशक्य आहे, इतकेच नव्हे तर काही अंक बंद ठेवण्याचीही पाळी येण्याचा संभव आहे. वास्तविक 'अर्थ'ची वार्षिक वर्गणी टपालखर्चासह ६ रु. आहे, तीच अत्यंत माफक आहे. परंतु ती न परवडणारी वर्गणी ह्या वर्षासाठीही ठेवण्याचे आम्ही ठरविले आहे. आमच्या हितचिंतकांनी ह्या आणीबाणीच्या प्रसंगी आमच्या सेवेतील संभाव्य त्रुटींकडे सहानुभूतीने पाहावे, अशी आमची त्यांना नम्र विनंती आहे.

### परदेशी कपड्यातील 'इंडियन'

"वैयक्तिक सुखाची व वैभवाची इच्छा माणसाने धरणे हे अगदी स्वाभाविक आहे. पण आपल्याबरोबर समाजाचेही भले होत असेल, तर ह्या गोष्टींना काहीतरी अर्थ आहे. इथल्या लोकांना दारिद्र्यात सोडून केवळ सुखासाठी देशत्याग करणे मला मंजूर नाही. पण संशोधनाच्या स्वातंत्र्याचा मात्र बळी देऊ नये, असे मला वाटते.

"परदेशात शिकून स्थाईक होण्याच्या इच्छेने आलेले भारतीय विद्यार्थी बहुतेक जण विचित्र कल्पना व अतिशयोक्त मते घेवून येतात. काहींना अमेरिकन गोष्टी श्रेष्ठ वाटतात, तर काहींना ब्रिटिश; तर काहींना जर्मन. सर्वजण भारतीय गोष्टींना मात्र नाके मुरडतात. येथे एक तरुण भेटला. अंगावरील प्रत्येक वस्तू कशी निरनिराळ्या देशातील आहे, हे अभिमानाने सांगत होता, आणि तशी माझी कुठली आहे असे मला विचारीत होता. त्याला मी विचारले, "अरे बाबा, ह्या परदेशी कपड्यांच्या आतील तू स्वतः 'इंडियन' आहेस, त्याचे काय!"

—डॉ. जयंत नारळीकर

### तुम्ही वेळ कसा घालवता!

बांगला देशचे राष्ट्राध्यक्ष श्री. अबु सैद चौधरी ह्यांनी आपल्या जागेचा राजीनामा देऊन त्यामानाने कितीतरी कमी मानाची जागा स्वीकारली आहे. त्यांनी आतापर्यंत भारताखेरीज दुसऱ्या कोणत्याही देशाला भेट दिली नाही. भारताचे राष्ट्राध्यक्ष श्री. गिरी त्यांच्यापेक्षा ३० वर्षांनी मोठे आहेत. श्री. गिरींनी ह्या भेटीच्या वेळी त्यांना विचारले, "तुम्ही तुमचा वेळ कसा घालवता, ते मला सांगाल, तर उपकार होतील."

### परदेशातील अर्धपोटी गरजूंच्या रक्तावर अमेरिकन कंपन्यांची श्रीमंती

अमेरिकन औषधी कंपन्या अविकसित, दरिद्री देशांतून मानवी रक्ताची मोठ्या प्रमाणावर आयात करून त्या रक्ताचे अॅल्ब्युमिन, गामा ग्लोब्युलिन, फायब्रिजेन, अँटी हेमोफायलिन, ग्लोब्युलिन, इत्यादींत रूपांतर करून आणि २०० पट फायद्याने त्यांची निर्गत करून गबर होत आहेत. ह्या कंपन्यांचे हुषार आणि तज्ज्ञ एजंट वेगवेगळ्या देशांतील व्यापारी पद्धतीच्या ब्लड बँकांतील अधिकाऱ्यांशी संधान बांधून रक्त मिळवितात. गरजवंत लोक आपले रक्त विकण्यास तयारच असतात. ह्या एजंटांचा मासिक पगार ८०,००० रुपयांपर्यंत असतो! वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने ह्या अमानुष व्यापाराची दखल घेण्याचे ठरविले आहे. अमेरिकन कंपन्यांचे एजंट मुंबईत जाळे पसरवू लागल्याचे उघडकीस आले आहे.

### बिगर-बँकिंग कंपन्यांवरील रिझर्व्ह बँकेची नियंत्रणे वाढणार

रिझर्व्ह बँक कायद्यात दुरुस्ती करून, जनतेकडून ठेवी घेणाऱ्या बिगर बँकिंग कंपन्यांवरील रिझर्व्ह बँकेची नियंत्रणे वाढविण्यात येत आहेत.

ह्यापुढे बिगर बँकिंग कंपनीच्या ऑडिटरवर, रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे कंपनीने जरूर ती रिटर्न्स व माहिती रिझर्व्ह बँकेकडे पाठविली किंवा नाही ह्याची चौकशी करण्याचे कायदेशीर बंधन घालण्यात येणार आहे. कंपनीने त्यात हयगय केली असल्यास ऑडिटरने रिझर्व्ह बँककडे त्याप्रमाणे रिपोर्ट करून अशा ठेवींचा आकडा कळवावयाचा आहे. रिझर्व्ह बँकेला आवश्यक वाटल्यास तिला कोणत्याही बिगर-बँकिंग कंपनीची तपासणी करण्याचा अधिकार दिला जाणार आहे.

### रात्री सिगरेट ओढू नका

रात्री जागे झाल्यावर सिगरेट ओढणारांना, रात्री सिगरेट न ओढणारांपेक्षा कॅन्सर होण्याचा जास्त संभव असतो, असे एका पाहणीत आढळून आले आहे.

### पुत्रप्राप्तीच्या आग्रहाचा कुटुंब नियोजन कार्यक्रमावर परिणाम

पुत्रप्राप्तीचा आग्रह कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम यशस्वी होण्याच्या मार्गात येतो, असे इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वेद प्रकाश ह्यांनी म्हटले आहे.

### मरणोन्मुख आदिवासी रुग्णांना जिवंत पुरले

जे आजारातून उठण्याजोगे नाहीत, अशा कित्येकांना त्यांच्या नातेवाइकांनी जिवंत पुरल्याची उदाहरणे तैवानमध्ये उघडकीस आली आहेत. मरणोन्मुख आदिवासींना बांधून पुरण्यात आले.

# श्री वारणा सहकारी बँक

## ग्रामीण भागातील एक यशस्वी संस्था

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील वारणा नदीच्या परिसरात वारणानगर येथे श्री वारणा सहकारी साखरकारखाना गेली काही वर्षे फार कार्यक्षमपणे चालला आहे. या सहकारी कारखान्यामुळे त्या परिसरातील लोकांचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक फायदा बराच झाला आहे. परंतु केवळ सहकारी साखर-कारखान्यावर समाधान मानणारे ते लोक नाहीत. त्याचबरोबर आणखी काहीतरी करण्याची त्यांची इच्छा नेहमीच असते. त्या दृष्टीने तेथील कार्यकर्त्यांचा विचार सतत चाललेला असतो. अशा या विचारमंथनातूनच आपली एखादी बँक असावी असा विचार सुरू झाला.

स्वतंत्र बँकेची जरूरी का भासली असे विचारले असता, बँकेचे मुख्य प्रवर्तक आणि सध्याचे अध्यक्ष श्री. तात्यासाहेब कोरे म्हणाले की, शहरातील बँकांकडून खेड्यातील सर्व गरजू माणसांना कर्ज मिळतेच असे नाही. तसेच या भागातच बँक असल्याने लहान शेतकरी, ग्रामीण कारागीर, शेतमजूर, यांच्या अडचणी ओळखून त्यांना कर्ज देणे शक्य होईल. सहकारी साखरकारखान्यामुळे ऊस असणाऱ्या शेतकऱ्यांची गरज भागत असली तरी ज्यांच्याकडे ऊस नाही, अशा कोरड-वाहू शेतकऱ्यांना अनेक अडचणी येतात. त्या अडचणी अशा बँकेमार्फत आम्ही सोडवू शकू अशी आमची अपेक्षा होती; आणि ती अपेक्षा पूर्ण झाली आहे, असे श्री. कोरे यांनी सांगितले.

आश्चर्याची व आनंदाची गोष्ट म्हणजे अगदी चार दिवसात १ लाख, ४३ हजार रुपयांचे भागभांडवल उभारून २८–२–६६ रोजी श्रीवारणा बँक रजिस्टर झाली. ग्रामीण भागातील एका सहकारी बँकेने जन्म घेतला. बँकेचे सभासद प्रामुख्याने शेतकरी, शेतमजूर, इतर कारागीर असेच आहेत. नोंदणीनंतर बँकेच्या कामास ताबडतोब वेगाने सुरुवात झाली. ३० जून, ६६ रोजी बँकेची 'अ' वर्ग सभासद संख्या ८५९ होती; त्या वेळी बँकेकडे ९६ हजार रुपयांच्या ठेवी होत्या आणि बँकेचे खेळते भांडवल २ लाख ४४ हजार रुपयांचे होते. लवकरच रिझर्व बँकेकडून प्राथमिक सहकारी बँक म्हणून तिला मान्यताही मिळाली.

### नेत्रदीपक प्रगती

बँकेचे कामकाज प्रारंभापासूनच चोख व प्रगतीपथावरच आहे. बँक खात्याच्या धोरणानुसार प्रारंभीची दोन वर्षे सोडून बँक सतत 'अ' वर्गात आहे. अशा प्रकारे सतत 'अ' वर्ग मिळविणाऱ्या फार थोड्या सहकारी बँका आहेत. ग्रामीण भागातील एका बँकेने अशी प्रगती करावी हे महत्त्वाचे आहे.

३० जून, १९७३ अखेर बँकेचे 'अ' वर्गातील १४२२ सभासद आहेत. तर 'ब' वर्ग नामधारी सभासद संख्या ३०८८ आहे. सध्या बँकेचे भागभांडवल ४,५०,२०० रुपये असून राखीव निधी २,०१,२५० रुपये आहे. इतर निधींची रक्कम २,६६,८२५ रुपये आहे. बँकेकडे पहिल्या वर्षी फक्त ९६ हजार रुपयांच्या ठेवी होत्या. त्यात सतत वाढ होत गेली आणि ठेवींची एकूण रक्कम ५३,३३,८६० रुपये झाली. संस्थेचे खेळते भांडवलही ७५,३५,६०० रुपयांपर्यंत गेले. विशेष म्हणजे बँकेस ३० जून, ७३ अखेर १, ५२, १२५ रुपयांचा फायदा झाला. ग्रामीण भागातील एखाद्या लहानशा सहकारी बँकेने सहा सात वर्षांच्या कालावधीत एवढे नेत्रदीपक यश मिळवावे, ही कोणासही अभिमान वाटणारी गोष्ट आहे.

बँकेने ३०–६–७२ अखेर ३८७९ लोकांना ३४·८४ लक्ष रु. ची कर्जे दिली आहेत. शिलाई मशीन, लाँड्री मशीन, ट्रॅक्टर, मोटर पंप, इंजिने, सायकल दुकाने अशा छोट्या व्यवसायांकरिता ८७ लोकांना ६·२६ लक्ष रु. कर्जाऊ दिले आहेत. तसेच अ व ब वर्गातील ३७५३ सभासदांना शेती-विकास, उद्योग-विकास व तारण जामीन आदींवर २५·९९ लक्ष रु. अदा करण्यात आले.

### खेड्यातील बँकेच्या शहरात शाखा

बँकेचे कार्यक्षेत्र प्रारंभी पन्हाळा तालुक्यातील २५ गावे व हातकणंगले तालुक्यातील १६ गावे असे होते, ते नुकतेच संपूर्ण कोल्हापूर जिल्हा व त्याच्या भौगोलिक मर्यादा असे झाले आहे. बँकेची पहिली शाखा किणी, ता. हातकणंगले, येथे १५ ऑगस्ट, ७१ रोजी सुरू करण्यात आली. बँकेची दुसरी शाखा कोल्हापूर शहरात शाहूपुरी पेठेत २६ ऑगस्ट, ७३ रोजी सुरू करण्यात आली. बँका शहरात स्थापन होतात आणि त्यांच्या शाखा खेड्यात सुरू होतात. पण श्री वारणा सहकारी बँकेने वेगळेच उदाहरण घडविले. ही बँक खेड्यात स्थापन झाली आणि खेड्यातल्या या बँकेने शहरात आपली शाखा सुरू केली. अशा प्रकारचे आगळे व वेगळे उदाहरण दुसरीकडे घडले असेल असे वाटत नाही.

बँकेची सध्याची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने महाराष्ट्र शासनाने बँकेला विश्वस्त ठेवी स्वीकारण्यास मान्यता दिली आहे. तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स, मुंबई या संस्थेने या बँकेस सभासदत्व दिले आहे. ठेवीदारांच्या सुरक्षितते-साठी बँकेने ठेव-विमा योजना स्वीकारली आहे. बँकेच्या हिशोब पद्धतीबद्दल तर 'आदर्श पद्धत' असे सरकारी तपासणी अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

---

### 'मुंबई बंद' चे आर्थिक परिणाम

दि. १८ च्या 'मुंबई बंद' मुळे तेथील ५८ कपासकापड गिरण्यांना १·२ कोटी रु. किंमतीच्या उत्पादनास मुकावे लागले. १३,००० हॉटेले आणि खाद्यगृहे बंद राहिल्यामुळे १२ लक्ष रु. चे नुकसान झाले. मुंबईतील सुमारे १२,००,००० लोकांचे जेवण हॉटेलातच होते. ११५ सिनेमा थिएटरांचे नुकसान ३ लक्ष रु. मरले. १,३०० बसगाड्यांची रोजची मिळकत ५·५ लक्ष रु. आहे, पण त्यापेक्षा खर्च अधिक असून रोजचे नुकसान ६०,००० रु. आहे. त्यामुळे, बसेस बंद पडल्यामुळे तेवढे नुकसान टळले.

### प. जर्मनीत परदेशीयांना नोकऱ्या नाहीत

पश्चिम जर्मनीच्या सरकारने युरोपिअन इकॉनॉमिक कॅम्युनिटी ह्या संघटनेच्या बाहेर असलेल्या देशांतील लोकांना जर्मनीत रोजगार देण्यात येऊ नयेत असा निर्बंध जाहीर केला आहे. युरोपीय देशांना अरब देशांनी तेलाचा पुरवठा बंद केल्यामुळे तेथे कारखाने बंद पडून कामगार बेकार होण्याची शक्यता दिसू लागली आहे. सध्या तरी ही बंदी तात्कालिक स्वरूपाची आहे. पश्चिम जर्मनीमध्ये २६ लाख परदेशीय कामगार कारखान्यांतून काम करीत आहेत. काम करण्यास समर्थ अशा एकूण कामगारांशी त्यांचे प्रमाण ११ टक्के पडते. निर्बंध घातल्याची घोषणा करताना प. जर्मनीचे मजुरमंत्री म्हणाले की, हा केवळ सावधगिरीचा पवित्रा आहे. जर्मन कामगारांना रोजगाराला मुकावे लागेल असे मानण्याचे कारण नाही. तेलाच्या पुरवठ्याचे संकट जर दीर्घ काळ चालू राहिले तर मोठ्या प्रमाणावर बेकारी उसळेल हे मानलेच पाहिजे. त्यातल्या त्यात रासायनिक कारखान्यांवर आणि मोटारकारखान्यांवर अधिक परिणाम होण्याची शक्यता दिसते. खुद्द जर्मनीतील कामगारांना बेकार होण्याची भीती भेडसावत असताना परदेशीय कामगारांनी रोजगार मिळविण्यासाठी जर्मनीत प्रवेश करावा ही गोष्ट पटण्यासारखी नाही. जर्मनीतील एकूण रोजगारांपैकी निम्मे रोजगार इंधनासाठी लागणाऱ्या तेलाच्या पुरवठ्यावर अवलंबून आहेत. ह्याचा अर्थ असा की तेलपुरवठ्यात १ टक्का कपात करण्यात आली तर ·५ टक्क्यांनी बेकारी वाढेल. गेल्या ऑक्टोबरमध्ये पश्चिम जर्मनीत २ लाख ६७ हजार कामगार बेकार म्हणून नोंदले गेले होते. परंतु त्याच वेळी उद्योगधंद्यातून ५ लाखांपेक्षा अधिक रोजगार मिळण्यासारखे होते.

---

### चोरट्या व्यापाराला तेजी आली काय ?

देशादेशांत चालणाऱ्या चोरट्या आयातीचा प्रश्न कमीअधिक प्रमाणांत सर्वच देशांसमोर असतो. अमेरिकेत चोरट्या मार्गाने प्रवेश करणाऱ्या अमली पदार्थांची माहिती सर्वांनाच आहे. भारतात चोरून आयात होणाऱ्या परदेशी वस्तूंचे प्रमाण बरेच आहे. त्यामुळे भारताला बहुमोल परदेशी चलनाला मुकावे लागते. चोरट्या आयातीविरुद्ध कार्यक्षम उपाययोजना करण्यासाठी पश्चिम युरोपातील काही देशांकडून भारत गस्त घालणाऱ्या वेगवान बोटी खरेदी करणार आहे. दरम्यान १९७२–७३ सालातील चोरट्या आयातीची कल्पना देणारे आकडे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. ह्या साली कस्टम्स खात्यातर्फे बेकायदा आयात करण्यात आलेल्या मालावर ज्या धाडी घालण्यात आल्या त्या मालाची किंमत २७·०४ कोटी रुपये भरली. त्या मागील साली धाडीघालून पकडलेल्या मालाची किंमत २०·३४ कोटी रुपये होती. पकडण्यात आलेल्या मालाच्या किमतीत जी वाढ झालेली दिसते तीवरून चोरट्या आयातीच्या व्यापाराला तेजी आलेली आहे असा अंदाज करता येण्यासारखा आहे. १९७२–७३ साली सगळ्यात जास्त धाडी महाराष्ट्र राज्यांत घालण्यात आल्या. राज्यांत धरण्यात आलेल्या मालाची किंमत १५·८७ कोटी रुपये आहे. महाराष्ट्राखालोखाल गुजरात, दमण, दीव दादरा आणि नगर हवेली ह्या संघ राज्याच्या अधिकारांत असलेल्या राज्यांतून चोरट्या मालाची आयात झाली. ह्या सर्व प्रदेशांत मिळून २·७५ कोटी रुपयांचा माल पकडण्यात आला एकूण ३५,००० पेक्षा अधिक धाडी घालण्यात आल्या. ९३९ संशयित गुन्हेगारांना पकडण्यात येऊन त्यांच्यावर खटले भरण्यात आले. पकडण्यात आलेला बहुतेक माल जप्त करण्यात आला. १९७३–७४ च्या पहिल्या सहामाहीत १६·०६ कोटी रुपयांचा चोरटा माल पकडण्यात आला. त्यावरून चोरट्या मालाचा प्रवेश पूर्वीसारखाच चालू असल्याचे दिसते.

---

### शेणखताच्या उत्पादनासाठी १८ कोटी रुपये

हिंदमधील शेतीच्या विकासासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नात खतांच्या उपयोगाला साहजिकच मोठे महत्त्व आहे. रासायनिक खतांच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण नाही. परदेशांत रासायनिक खतांच्या किमती जबर वाढल्या आहेत. त्यांची आयात महाग पडणार असल्याने देशातील घाण-कचऱ्याचा उपयोग करून खताची निर्मिती करणे आवश्यक झाले आहे. अशा रीतीने खतांची निर्मिती करण्यासाठी भारत सरकारने पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात १८ कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले आहे. शहरांत आणि ग्रामीण भागांत अनेक प्रकारचा टाकाऊ केरकचरा असतो त्यात प्रामुख्याने शेणाचा समावेश असतो. फर्टिलायझर कमिशनर श्री. बारोआ ह्यांनी असा हिशेब सांगितला आहे की देशात रोज ७,००० टन शेण उपलब्ध होते, परंतु त्यातील जेमतेम अर्धा हिस्सा खत म्हणून वापरण्यात येते. बाकीच्या शेणाचा गोवऱ्या करून इंधनासाठी वापर करण्यात येतो. ह्या शेणाचा उपयोग करून स्वयंपाकासाठी लागणारा ज्वालाग्रही वायू—'गोबर गॅस' भट्टीत निर्माण करता येतो. ग्रामीण भागात अशा भट्ट्या स्थापन करण्यास सरकार उत्तेजन देणार आहे. मुंबईतील गोठ्यांतून दररोज १,१०० टन शेण उपलब्ध होते शिवाय आरे येथील दूधवाडीत रोज ३०० टन शेण मिळू शकते. मुंबई कार्पोरेशन आणि सरकार एक संयुक्त प्रयत्न करून ह्या शेणखतापासून खत आणि इंधन-वायू तयार करण्याची योजना आखणार आहे. १०० पौंड शेणापासून १ लिटर घासलेट तेलाची उष्णता देणारा ज्वालाग्राही वायू निर्माण करता येतो. 'गोबर गॅस' निर्माण करणाऱ्या ७ हजार भट्ट्या सध्या देशात आहेत. पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात आणखी ६ हजार भट्ट्या उभारण्याचे ठरविण्यात आले आहे, त्यांपैकी १ हजार महाराष्ट्रात असतील.

---

## ग्रेटब्रिटन सुएझ कालव्याला मुकले;

## आता अमेरिका पनामा कालव्याला मुकणार काय?

उत्तर अमेरिका खंड आणि दक्षिण अमेरिका खंड पनामा प्रजासत्ताक देशाने जोडलेले आहे. ह्या देशाला विभागणारी ५५८ चौरस मैलांची पट्टी १९०३ सालापासून अमेरिकेच्या सार्वभौम अधिकाराखाली आहे. ॲटलँटिक आणि पॅसिफिक महासागरांना जोडणारा वाहतुकीचा पनामा कालवा त्या पट्टीच्या मध्यभागी आहे. ह्या ५५८ चौरस मैलांचा प्रदेश पनामाने अमेरिकेला कायमचा देऊन टाकलेला आहे. त्यावर पनामा सरकारचा काहीही अधिकार उरलेला नाही. अमेरिकेने पनामा सरकारला १ कोटी डॉलर्स रोख देऊन आणि दरसाल २½ लक्ष डॉलर्स देण्याचे मान्य करून हा प्रदेश मिळविला. आता ही वार्षिक देण्याची रक्कम १९ लक्ष, ३० हजार डॉलर्स झाली आहे. ह्या करारान्वये कोलंबियापासून स्वतंत्र झालेल्या पनामा देशाच्या स्वातंत्र्यरक्षणाची हमी अमेरिकेने घेतली, ह्या नव्या राष्ट्राला उत्पन्नाचे एक नवे साधन मिळाले आणि पनामामधील लोकांना रोजगारही प्राप्त झाला.

ह्या पनामा कालव्याच्या प्रदेशात एक छोटी अमेरिकाच निर्माण झाली, आणि तेथील श्रीमंतीमुळे पनामातील लोकांना असूया वाटू लागली. येथील अमेरिकनांना पनामाची स्पॅनिश भाषा शिकण्याचे कारणच वाटले नाही. १९०३ च्या करारात हळूहळू दुरुस्त्या करण्याची अमेरिकन सरकार तयारी दाखवीत गेले. अमेरिकेने ह्या कालवा प्रदेशात ६५० कोटी डॉलर्स कालव्याच्या प्रीत्यर्थ खर्च केलेले आहेत. मे १९५८ मध्ये पनामा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी कालवा प्रदेशात शिरून पनामाची ७२ निशाणे ठिकठिकाणी उभारली; पुढेही निदर्शने होतच राहिली. १९६० मध्ये अमेरिकन सरकारने एक हुकूम काढून कालवा विभागातील काही ठिकाणी अमेरिकेच्या निशाणाबरोबर पनामाचे निशाणही लावण्याची पद्धत सुरू केली. पनामामधील लोकमत अमेरिका-विरोधी बनत चालले होते, त्यास आळा घालण्यासाठी ही योजना होती. अमेरिकेच्या विधितज्ज्ञांच्या मते अमेरिकेने पाय काढल्यावर हा प्रदेश पनामाकडे जाईल एवढाच ह्या निशाणांचा अर्थ होता, तर पनामाच्या राष्ट्रवाद्यांच्या मते अमेरिकेने पनामाचे सार्वभौमत्व मान्य केले असा अर्थ होता.

९ जून १९६४ रोजी अमेरिकन शाळेतील मैदानात अमेरिकन विद्यार्थ्यांनी अमेरिकेचे निशाण चढविले. लागलीच पनामाच्या विद्यार्थ्यांनी स्वतःचे निशाण फडकविण्याचा प्रयत्न केला. त्यातून दंगे उद्भवले. १९६४ ते १९६७ ह्या काळात दोन्ही देशांत १९०३ च्या कराराऐवजी नवीन करार करण्याबाबत वाटाघाटी चालू होत्या. परंतु प्रत्यक्ष करार होऊ शकला नाही. कारण, अमेरिकन लोकमत पनामाला सार्वभौमत्व देण्यास तयार नव्हते. अमेरिकेचे धोरण कचखाऊ आहे असा प्रचार करण्यात आला. पनामाने आता पुन्हा आक्रमक धोरण पत्करले आहे.

व्हिएटनामच्या युद्धाच्या १२ वर्षांच्या कटू अनुभवानंतर अमेरिकेच्या जनतेला नव्या आंतरराष्ट्रीय अडचणीत सापडून घ्यायचे नको आहे, आणि पनामाच्या पुढाऱ्यांना हा क्षण आक्रमणास सोईचा वाटत आहे. पनामा सरकारने युनायटेड नेशन्सच्या सिक्युरिटी कौन्सिलची मार्च १९७३ मधील सभा न्यूयॉर्कऐवजी पनामा सिटीत भरविण्यात यश मिळविले. त्यामुळे अमेरिकेच्या वसाहतवादाकडे जगाचे लक्ष वेधले गेले.

१५ ऑगस्ट, १९१४ रोजी पनामा कालवा व्यापारी आग-बोटींच्या वाहतुकीला खुला झाला, तेव्हापासून आतापर्यंत वेगवेगळ्या देशांच्या ५,००,००० आगबोटी त्या कालव्यातून गेल्या असतील. प्रत्येक आगबोट सुमारे ६,१८५ डॉलर 'टोल' म्हणून देते, पण प्रत्येक सफरीच्या वेळी ७,००० मैलांचा वेढा टाळून आणि २० दिवसांची बचत करून ५०,००० डॉलर्स वाचविते. दररोज सरासरीने ३९ आगबोटी ह्या कालव्यातून ये-जा करतात. मालाच्या एकूण वाहतुकीपैकी दोन तृतीयांश माल अमेरिकेच्या निर्गतीचा किंवा आयातीचा असतो. ह्या कालव्यावर इतर देशांची वाहतुकही मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, जपानच्या दर्यावर्दी वाहतुकीपैकी एक तृतीयांश वाहतूक ह्या कालव्यातून होते. इक्वेडॉर, चिली आणि पेरू ह्यांच्या आयात-निर्गतीपैकी ८०% वाहतुकीस हा कालवा सोईचा पडतो. दक्षिण अमेरिकेतील ह्या देशांना भावनेच्या दृष्टीने पनामा देशाच्या कालव्यावरील सार्वभौमत्वाला पाठिंबा देणे भाग आहे. पण पनामाला खरोखरच कालव्यावर सार्वभौमत्व मिळाले तर आपल्या स्वतःच्या आर्थिक भवितव्याबद्दल त्या देशांना चिंता वाटते. कारण, १९३० पासून आतापर्यंत पनामामध्ये सहा वेळा सरकारची बेकायदा मार्गे उलथापालथ झालेली आहे. कालव्यावरील अमेरिकेचा ताबा सुटला, तर पनामा टोल वाढवून स्वतःचे उत्पन्न वाढविण्याकडेच लक्ष देईल; योग्य टोल घेऊन जागतिक व्यापारास हातभार लावण्याचे धोरण सोडून दिले जाईल. पनामामध्ये कम्युनिस्टांचे वर्चस्व वाढत आहे; विशेषतः विद्यार्थीवर्गात. कालव्याचा प्रदेश अमेरिकेतच, ५१ वे संस्थान म्हणून, समाविष्ट करून ह्या प्रश्नाचा निकाल लावावा असा अमेरिकेत एक सूर आहे.

ब्रिटन सुएझ, एडन, इत्यादी समुद्राच्या जलमार्गाच्या मोक्याच्या ठिकाणांना मुकला आहे. अमेरिकाही पनामा कालवा हातचा घालविणार काय? ब्रिटनचा सूर्य अस्तास गेल्यामुळे त्या देशाला युरोपच्या सामायिक बाजारपेठेत आश्रय घ्यावा लागत आहे. अमेरिकेच्या वर्चस्वासही तडा बसून इंग्रजी मातृभाषेच्या राष्ट्रांची जगावरील पकड कमी होणार काय?

———

## पाकिस्तानला रशियन तंत्रज्ञांची मदत

कराचीमध्ये काढण्यात यावयाच्या पोलादाच्या कारखान्याच्या उभारणीसाठी रशियातून ७०० तंत्रज्ञ धाडण्यात येणार आहेत. त्याशिवाय रशियातील पोलादकारखान्यांतून काम करून शिक्षण घेण्यासाठी १२१३ एंजिनिअर्स आणि तंत्रविशारद रशियात धाडण्यात येणार आहेत. १९७५ पासून त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ होईल आणि ते तीन वर्षांत पूर्ण करण्यात येईल. तांत्रिक शिक्षण देण्यासंबंधी उभयता देशांत नुकताच एक करार करण्यात आला आहे. पाकिस्तानात शिक्षणाचा प्रसार गेल्या २५ वर्षांत समाधानकारक झाला नाही. अर्थातच तांत्रिक शिक्षणासाठी लागणारी प्राथमिक तयारीही विद्यार्थ्यांत दिसून येत नव्हती, असा अभिप्राय परदेशीय निरीक्षकांनी व्यक्त केलेला आहे.

---

## चहाच्या मळ्यांना तेल-टंचाईचा फटका

तेलाच्या टंचाईमुळे भारतातील उद्योगधंद्यांवर संकटाची छाया पडू लागली आहे. दक्षिण भारतामधील चहाच्या मळ्यांना भट्टीच्या तेलाचा तुटवडा पडण्याची शक्यता दिसू लागली आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने मळ्यांच्या चालकांना असे कळविले आहे की त्यांना लागणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्यात खूप मोठी कपात करावी लागणार आहे. चहावर संस्करण करून तो बाजारासाठी तयार करणाऱ्या कारखान्यांनी तेलाऐवजी कोळसा आणि जळाऊ लाकूड वापरावे असे सुचविण्यात आले आहे. दक्षिण भारतामधील चहाच्या मळ्यांच्या संघटनेने असे स्पष्ट सांगितले आहे की इंधनाच्या पुरवठ्यात कपात झाल्यास चहाच्या संस्करणाचे सर्व मळे बंद करावे लागतील.

---

## "कृपया ठेवी काढून घेऊ नका"

अरबी तेलाने निर्माण केलेल्या अरब देशांच्या सुमारे १,५०० कोटी डॉलर्सच्या ठेवी परदेशी ठेवलेल्या आहेत, त्यापैकी एक दशांश ठेवी ब्रिटनमध्ये आहेत. "ह्या ठेवी कृपा करून काढून घेऊ नका" अशी विनंती ब्रिटिश पंतप्रधानांनी अरब देशांना केली आहे. अरबी देशांच्या विकासयोजनांत गुंतविण्यासाठी ह्या ठेवी काढून घेण्यात याव्यात, अशी शिफारस अरब देशांना अरब लीग इकानॉमिक कौन्सिलने केली होती. ठेवी तातडीने काढून घेण्याचा अरब देशांचा विचार नव्हता, पण अरब लीगच्या ठरावाने घबराट निर्माण केली होती; लंडनमधील शेअर्सचे भाव घसरले होते.

---

## अमेरिकेत घड्याळ एक तास पुढे

अमेरिकेत तेलाची बचत करण्यासाठी ६ जानेवारीपासून घड्याळ एक तास पुढे करण्यात येणार आहे. त्यामुळे दररोज १,५०,००० तेलाच्या पिपांची बचत होईल. ही योजना दोन वर्षे अमलात येईल.

---





"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."
—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१


प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४१ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

Swastik FOAM

cosy sitting pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

Dattaram-SRP-



BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )


*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth, BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*






प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर

किर्लोस्कर एंजिन - शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

Tom & Bay KO-7315a M

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!


# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और दूसरे देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और [illegible] आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही समय में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है। २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र — [illegible] सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

हर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन : कार्यालय : २५३३७२ कारखाना : [illegible]



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)